सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामंजूर/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-१/३६ ठ. क्र. ४६
दि. १२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/३६

मा. मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक १६-३-२०१६ च्या पत्रामध्ये नमूद वारंवार उद्भवणा-या या पाणी टंचाईच्या समस्येमुळे पाणी नियोजनाबाबत व्यापक जनजागृती होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यांत येणार आहेत. या मोहिमेचाच एक भाग म्हणून पाण्याचा अपव्यय टाळणे व टंचाई परिस्थिती लक्षात घेता आपल्या अखत्यारीतील जलतरण तलाव पावसाळा सुरु होईपर्यंत बंद ठेवण्यासंबंधी उचित निर्णय घेवून कार्यवाही करण्यात यावी. असे पत्र दिले असून त्याअनुषंगाने पोहण्याच्या तलावाबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती असून १) श्री. मार्कंडेय जलतरण २) स्वा. वीर सावरकर जलतरण तलाव असे असून सध्या दोन्ही जलतरण तलाव व्यवस्थीतपणे चालू आहेत. पोहण्याचा तलावामध्ये मासिक सभासद, वार्षिक, पंचवार्षिक, दशवार्षिक, कौटुंबिक व ज्येष्ठ नागरिक अशा प्रकारचे सभासदांची मोठी संख्या आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय आदेशानुसार दोन्ही जलतरण तलाव बंद ठेवावयाचे झाल्यास म.न.पा.चे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. सभासदांची गैरसोय होवून ओरड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जर सदर कालावधीमध्ये तलाव बंद ठेवावयाचे झाल्यास किती दिवस तलाव बंद ठेवण्यात येणार आहे तितकेच दिवस सभासदांना पोहण्याचे तलाव चालू झाल्यावर तेवढे दिवस सभासदांना वाढवून द्यावे लाणार आहे. तरी जलतरण तलाव बंद ठेवावयाचे झाल्यास कोणत्या तारखेपासून कधी पर्यंत बंद ठेवावयाचे तसेच प्रस्तावात नमूद मा. मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य मंबई यांचे दि. १६-३-१६ च्या पत्राच्या आदेशानुसार कार्यवाही होण्याबाबत सो.म.पा.कडील दोन्ही जलतरण तलाव बंद ठेवावे किंवा कसे याबाबत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १८-४-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

सो.म.पा.कडील दोन्ही जलतरण तलाव पाऊस सुरु होईपर्यंत बंद ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तातडी/३६ ठ. क्र. ३८ दि. १२/५/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/३७

दैनिक संचारचे उपसंपादक श्री. प्रशांत जोशी यांना नागपूरच्या अरविंद बापू देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. के. विद्यासागर राव यांचे हस्ते व मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील राजभवनात देण्यात आले. या मिळालेल्या पुरस्काराबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत असून, त्यांना महाराष्ट्र प्रतिष्ठानतर्फे रोख २१,०००/- व सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला असून, त्यांचा यथोचित सत्कार करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका